# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०६/०१/२०२३ (शुक्रवार) सायंकाळ**

---

## पोलीस स्टेशन MIDC बोरी येथील Sextorstion चा सायबर फ्रॉडचा गुन्हा उघड करून गुन्हयातील आरोपीतांना गुन्हयात वापरलेले मोबाईलसह हरियाणा वरून सायबर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणची कारवाई

पोलीस स्टेशन MIDC बोरी येथील Sextorstion चा सायबर फ्रॉडचा गुन्हा उघड करून गुन्हयातील आरोपीतांना गुन्हयात वापरलेले मोबाईल सह सायबर पोलीस स्टेशन व स्थानिक गुन्हे शाखा, व पोस्टे MIDC बोरी, नागपूर ग्रामीणची कारवाई दिनांक १३/०६/२०२२ पोस्टे MIDC बोरी येथे फिर्यादी यांने दिलेले फिर्याद नुसार अंदाजे नोव्हेंबर २०२१ मध्ये फिर्यादीला एका अनओळखी मुलगी नामे– कविता वाघमारे यांनी फ्रॉड रिक्वेस्ट पाठवली व फिर्यादी सोबत फेसबुक वर चैटींग करून व्हॉटस ॲप नंबर घेतले. तसेच फिर्यादीला व्हिडीओ कॉल करून अश्लील व्हिडीयो दाखवुन फिर्यादीचे चा चेहरा अश्लील व्हिडिओ सोबत Screanrecorder चा वापर करून रेकॉर्ड करून घेतला. रेकॉर्ड केलेले व्हिडिओ फिर्यादीला पाठवुन फिर्यादीचा चेहरा असलेले अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देवुन फिर्यादी कडुन वेळोवेळी पैश्यांची मागणी करून फिर्यादी कडुन एकुण १,५०,००० रूपये घेवुन आर्थिक फसवणुक केली. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे डप्क्ब बोरी येथे गुन्हा दाखल करण्यात आले होते.

मागील एक वर्षापासुन फिर्यादीला तिन वेगवेगळया फेसबुक आई.डी. आणि विविध मोबाईल नंबर वरून कॉल करून पैश्यांची मागणी करत होते. सदर गुन्हयाचा समांतर तपास सायबर पोलीस स्टेशन जिल्हा नागपुर ग्रामिण यांचे कडे असुन आरोपीताचे तांत्रिक बाबीचे विश्लेशन केले असता आरोपी हे हरीयाणा राज्यातील जिल्हा नुह मेवात येथील तहसिल नगीना गाव नानगल मुबारकपुर या हरीयाणा राजस्थान सिमेवर असलेले गावतुन मोबाईल फोन वापरत असल्याबाबत समजले वरून सदर ठिकाणी विशेष पोलीस पथक तयार करून आरोपीचे शोध घेण्यासाठी पाठविले असता सदर गुन्हयातील आरोपीतांना त्यांचे राहते घर गाव नानगल मुबारकपुर, ता नगीना जिल्हा नुह मेवात हरियाणा येथून अटक करून गुन्हयात वापरलेले मोबाईल सह आरोपी क्र.१ अफजल खान रसुल खान, व त्याचा साथीदार आरोपी क्र. २ रहीस उर्फ रूबिन आजाद खान यांना अटक करून गुन्हयाची उकल करण्यात आली आहे. पुढिल तपास पोलीस स्टेशन MIDC बोरी करत आहे.

सदरची कारवाई ही नागपूर ग्रामिण चे पोलीस अधीक्षक श्री. विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक श्री. डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे स्थानिक गुन्हे भाखा, यांचे नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक श्री. आषिशसिंह ठाकुर, पोउपनि निशांत जुनोनकर, नापोषि, विपीन गायधने, बालाजी साखरे, स्था.गु.शा. मपोहवा स्नेहलता ढवळे, मनापोषी संगिता वाघमोरे, नापोषि, सतिष राठोड पो.षी प्रफुल बागडे मृणाल राउत सचिन भोयर सायबर सेल यांनी पार पाडली.

सदर गुन्हयातील आरोपीतांचे मोबाईल मध्ये बनावट फेसबुक आई डी १. Kavita.Waghmare 2. Arti Kumari 3. Monika Sethi या नावाची फेक आईडी तयार करून व आपला राहण्याचा पत्ता नागपुर

चा देवुन नागपूर व स्थानिक लोकांन सोबत मैत्री करून त्यांचे फसवणुक केलेली आहे. नागपुर ग्रामिण पोलीस मार्फत लोकांना आव्हाण करण्यात येते कि फेसबुक व्हॉट्स ॲप व इतर सोशल मिडीया वर अनओळखी लोकांसोबत मैत्री करून नये व त्यांच्या सोबत कोणताही आर्थिक व्यवहार करू नये.




## जबरी संभोग करण्या—या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पोस्टे कन्हान** :— दिनांक १४/०७/२०१८ चे २०.५६ वा दरम्यान फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पोस्टे कन्हान येथे अप क्रमांक २४७/२०१८ कलम ३७६(२),३७६ (अ) (ब)भादवी सहकलम ४,५,६ पोक्सो अन्वये गुन्हा नोंद झालेला होता

दिनांक १४/०७/२०१८ चे १४.०० वा आरोपी नामे सोनु प्रेमदिन उर्फ रामाजी प्रजापती वय २३ वर्ष रा कामठी कन्हान याने पिडीतेस मोबाईल चार्जिंगला लावण्या करीता पीडीतेस आरोपी च्या घरी नेवुन देण्यास सांगीतले . तसेच पीडीतेच्या मागे घरी जावुन पीडीतेकडुन मोबाईल घेवुन पीडीत मुलगी ही अल्पवयीन आहे हे माहीत असुन सुध्दा पीडीतेशी जबरी संभोग केला .

सदर प्रकरणाचे तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन आगासे पोलीस स्टेशन कन्हान यांनी करून सदर प्रकरण न्यायप्रविष्ठाकरीता मा.कोर्टामध्ये सादर केले.आज दिनांक ६/०१/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधिश श्री राठी

यांनी वरील नमुद आरोपीला कलम ६ पोक्सो मध्ये १० वर्ष सश्रम कारावास व २०००/—रूपये दंड ,दंड न भरल्यास २ महीने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी.श्री श्याम खुळे यांनी काम पाहीले.कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस शिपाई बन १४६८ सैफुल्लाह अहमद पोस्टे कन्हान यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**